भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
India's Central Bank

डॉ. अविनाश रामलाल निकम,
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
पी.एस.जी.व्ही.पी. मंडळाचे कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
शहादा, जिल्हा. नंदुरबार.

# भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्यपद्धती

**प्रस्तावना :**

*जगात व्यापारी बँकांच्या स्थापनेपासूनच ठेवी स्विकारणे व कर्ज देणे ही दोन मूलभूत कार्ये त्या करिता आहेत. मुद्रा आणि वित्तपुरवठा या दोन मूलभूत बाबींच्या आधारावर देशाची औद्योगिक आणि आर्थिक प्रगती होत असते. त्यामुळे जगात वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले. परंतु या संस्थांवर नियंत्रण नसेल तर अर्थव्यवस्थेच्या कल्याणाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. देशाचा विकास योग्य दिशेने होण्यासाठी या बँकांवर नियंत्रणाची आवश्यकता असते. त्या दृष्टीने प्रत्येक देशात बँकिंग प्रणालीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती/केंद्रीय बँकेची स्थापना केलेली असते.*

**मध्यवर्ती बँकिंग प्रणालीचा विकास :**

*मध्यवर्ती बँकिंग प्रणालीचा विकास खूप जुना नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभी पर्यंत बँकिंगचे स्वरूप स्पष्ट झालेले नव्हते. मध्यवर्ती बँकेचे महत्त्व सर्वप्रथम स्वीडनने ओळखले. १६५६ मध्ये स्वीडन मध्ये 'रिस्क बँक ऑफ स्वीडन'* (Risk Bank of Sweden) *मध्यवर्ती बँकेच्या स्वरूपात स्थापन केली गेली. त्याच धर्तीवर १६९४ मध्ये इंग्लंड मध्ये बँक ऑफ इंग्लंड ची स्थापना केली गेली. बँक ऑफ इंग्लंडच्या स्थापनेनंतर मध्यवर्ती बँकिंग तंत्राचा विकास झाल्याचे मानले जाते. कारण या बँकेच्या कार्यपद्धतीचे अनुकरण जगातील इतर केंद्रीय/मध्यवर्ती बँकेद्वारे केले गेले आहे. सन १८०० मध्ये 'बँक ऑफ फ्रान्स'ची स्थापना सरकारी सहाय्यता व खाजगी भांडवलाच्या मदतीने करण्यात आली. त्यानंतर १८१४ मध्ये 'बँक ऑफ नेदरलँड', १८१७ मध्ये 'बँक ऑफ नार्वे', १८१८ मध्ये 'बँक ऑफ ऑस्ट्रेलिया', १८५० मध्ये 'बँक ऑफ डेन्मार्क' आणि १८५६ मध्ये 'बँक ऑफ स्पेन' ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १८६०,१८७५ आणि १८८२ मध्ये अनुक्रमे 'बँक ऑफ रशिया', 'रिश बँक ऑफ जर्मनी' आणि 'बँक ऑफ जपान' ची स्थापना करण्यात आली. भारतात देखील १६३५ मध्ये 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' या नावाने मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्यात आली. ही बँक चलन आणि बँकींग क्षेत्रावर नियंत्रण ठेवणारी एक शिखर बँक होय.*

*''देशाच्या चलन आणि बँकिंग संरचनेच्या शिखर स्थानी असलेली बँक म्हणजे मध्यवर्ती बँक होय'', अशी व्याख्या प्रा.डी. कॉक यांनी केली आहे. मध्यवर्ती बँक ही देशाच्या बँकिंग व्यवस्थेतील शिखर संस्था आहे. देशातील चलन व बँकींग व्यवस्थेला योग्य दिशा देण्याचे कार्य ही बँक करते.*

**मध्यवर्ती बँकेची कार्ये :-**

*इतर व्यापारी बँकांप्रमाणे मध्यवर्ती बँक लोकांकडून ठेवी स्वीकारत नाही अथवा लोकांना कर्जे देत नाही. तर देशाच्या हिताच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य मध्यवर्ती बँकेला करावे लागते. प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँक देशाच्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात पेसा व पतपैसा यावर नियंत्रण ठेवून अर्थव्यवस्थेचा विकास साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. अर्थतज्ज्ञ डी. कॉक यांनी आपल्या 'सेंट्रल बँकींग' या ग्रंथात मध्यवर्ती बँकेची कार्ये स्पष्ट केली आहेत. प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँकेच्या कार्यात भिन्नता आढळून येत असली तरी अर्थव्यवस्थेच्या आर्थिक स्थैर्यासाठी प्रयत्नशील राहणे हे महत्त्वाचे कार्य जवळ-जवळ प्रत्येक देशात दिसून येते. प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँक आपल्या अर्थव्यवस्थेतील गरजेनुसार कार्य करते. भारताची मध्यवर्ती बँक 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' ला पुढील कार्ये करावी लागतात.*

***१) चलन निर्मिती :-*** *मध्यवर्ती बँकेच्या स्थापनेपासून कागदी चलन निर्मितीची जबाबदारी टाकण्यात आली आहे. पूर्वी चलन निर्मितीचे कार्य व्यापारी एकाधिकार सरकारने रिझर्व्ह बँकेला दिला. देशातील परिस्थिती व सरकारचे अर्थविषयक धोरण लक्षात घेऊन चलन पुरवठा कमी अधिक करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवर टाकण्यात आली. यासाठी रिझर्व्ह बँकेत एक स्वतंत्र चलन निर्गमन विभाग असतो. रिझर्व्ह बँकेने निर्माण केलेल्या कागदी चलनास सरकारचे पाठबळ असल्याने त्याची विश्वासार्हता वाढून*

*चलनाला प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे उद्योग व व्यापाराच्या वाढीस चालना मिळते. चलन पुरवठ्याची मक्तेदारी मध्यवर्ती बँकेकडे असल्यामुळे व्यापारी बँक निर्मित पतपैशांवर अधिक परिणामकारक नियंत्रण ठेवू शकते. कारण पतपैसा निर्माण करण्यासाठी राखीव निधी म्हणून पैशाची/चलनाची गरज असते.*

***२) सरकारची बँक : –*** *सरकाची बँक, सरकारचा प्रतिनिधी म्हणून रिझर्व्ह बँक काम पाहते. रिझर्व्ह बँक ही सरकारची बँक असल्याने सरकारच्या सर्व विभागांची व सहकारी संस्थांची खाती बँकेत उघडली जातात. सरकारच्या वतीने रोख पैसा स्विकारणे, धनादेश, डिमांड ड्राफ्ट स्विकारणे व देणे इ. कार्ये रिझर्व्ह बँक करते. तसेच सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन करते. मध्यवर्ती बँक सरकारला कर्ज पुरवठा करते. सरकारच्या वतीने प्रतिभूतींची खरेदी-विक्री करते. आर्थिक बाबींविषयी केंद्र व राज्य सरकारे रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेतात.*

***३) बँकांची बँक :–*** *रिझर्व्ह बँक ही बँकांची बँक म्हणुनही कार्य करते. ही बँक देशातील व्यापारी बँका व इतर बँकांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करते. रिझर्व्ह बँक इतर बँकांच्या रोख ठेवींचा संरक्षक म्हणून कार्य करते. व्यापारी बँका आपल्याकडील ठेवींचा काही भाग एक सूविधा म्हणून अथवा एक कायदेशिर बाब म्हणून रिझर्व्ह बँकेकडे ठेव म्हणून ठेवतात. ही ठेव व्यापारी बँकांना आंतर बँक देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी उपयोगी पडते. देशातील प्रत्येक व्यापारी बँकेने आपल्या कडील एकुण ठेवींच्या एका विशिष्ट प्रमाणात रक्कम मध्यवर्ती बँकेकडे ठेवली पाहिजे. असे कायदेशिर बंधन असते.*

***४) परकीय चलनाचा रक्षक :–*** *रिझर्व्ह बँक परकीय चलन साठ्याचा रक्षक म्हणून कार्य करते. देशातील परकीय चलन साठा सांभाळण्याची जबाबदारी रिझर्व्ह बँककडे सोपविण्यात आली आहे. पतचलनाचा आधार म्हणून मौल्यवान धातू आणि विदेशी चलनाचे साठे मध्यवर्ती बँक स्वतःकडे राखून ठेवते. असे साठे ठेवण्यास मध्यवर्ती बँकेस कायदेशीर परवानगी दिलेली आहे.*

***५)परकीय चलनाचा रक्षक :***

*व्यापारी बँका विविध विनिमय पत्रांची वटवणूक करतात. या विनिमय पत्रांची(बिलांची) पुर्नवटवणूक मध्यवर्ती बँकेकडून करून व्यापारी बँकांना रोख रक्कम मिळवता येते. मध्यवर्ती बँकेच्या याच कार्यास अंतिम कर्जदाता म्हणून कार्य असे संबोधले जाते. व्यापारी बँकांना रोकडची गरज असेल तर व्यापारी बँक मध्यवर्ती बँकेशी संपर्क साधते. मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांची गरज लक्षात घेऊन विनिमय पत्रांची पूर्नवटवणूक करून रोकडची व्यवस्था करून देते. त्यावर मध्यवर्ती बँक जो व्याजदर आकारते त्याला बँकदर असे म्हणतात.*

***६) पतनियंत्रण :***

*व्यापारी बँका कर्जव्यवहारातून पतनिर्मिती करीत असतात. मध्यवर्ती बँकेस देशातील बँक व चलन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे लागते. पतनियंत्रणाचा प्रमुख हेतू अर्थव्यवस्थेच्या गरजेनूसार योग्य त्या प्रमाणात देशातील बँकांनी पतनिर्मिती करून देशाच्या अर्थव्यवस्थेला विकासाचा हातभार लावावा हा असतो. व्यापारी बँका नफ्याच्या हेतुने प्रेरीत होऊन आवश्यकतेपेक्षा अधिक पतनिर्मिती अनेकवेळा करतात किंवा कधी नुकसानीच्या भितीने कमी पतनिर्मिती करतात. अशावेळी देशाचे आर्थिक स्थैर्य धोक्यात येते. देशातील आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी मध्यवर्ती बँक पतनियंत्रणाचे कार्य करते.*

***७) समाशोधन गृह :***

*बँका-बँकातील आर्थिक व्यवहार पूर्ण करण्याचे कार्यही मध्यवर्ती बँक करते. देशातील सर्व व्यापारी बँकांच्या ठेवी मध्यवर्ती बँकेकडे जमा असल्याने मध्यवर्ती बँकेला बँकांचे परस्परातील देण्या-घेण्याचे व्यवहार पूर्ण करता येतात. म्हणून मध्यवर्ती बँकेला व्यापारी बँकासाठी समाशोधन गृह क्लिअरींग हाऊस चालविता येते. आठवड्यातून ठरावीक दिवशी ठरवलेल्या वेळेत सर्व बँकांचे प्रतिनिधी समाशोधन केंद्राच्या ठिकाणी एकत्र येतात. समाशोधन केंद्रात येणी व देणी त्यांच्या खात्यावर जमा किंवा नावे टाकून मिटविली जातात.*

***८) इतर कार्ये :–***

*विकसनशील देशात मध्यवर्ती बँका केवळ नियंत्रणाचे कार्य करत नसून विकासाचे देखील कार्य करीत आहेत. रिझर्व्ह बँक बँकांसाठी व अर्थव्यवस्थेसाठी विविध प्रकारची आकडेवारी व माहिती जमा करते. बँक व्यवसायाच्या विकासासाठी नवीन योजना आणते. देशातील सर्व क्षेत्रांना गरजेनुसार वित्तपुरवठा करण्याची अंतिम जबाबदारी देखील मध्यवर्ती बँकेवरच असते.*

*अशाप्रकारे मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्य व विकासासाठी आपले महत्त्वपूर्ण कार्ये करून योगदान देत आहे.*

***संदर्भसूचि :–***

*१) कोलगणे एस.बी., कोलगणे बी.एन., बँकींग, २००४, नारायणी प्रकाशन, नांदेड, पृ.१३८,१३९.*

*२) डॉ. सरोदे जयश्री.,डॉ. दिवटे के.बी., बँक व्यवसायाची तत्वे व कार्यपद्धती, २०१५, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृ.८७.*

*३) डॉ. दातीर आर.के., आधुनिक बँकव्यवसाय, २०१५.*

*४) प्रा. कोलते एस.एम., बँकिंग तत्त्व आणि व्यवहार, २०१५, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, पृ. ३६७.*

*५) डॉ. महाजन मुकूंद, बँकिंग ॲण्ड फायनान्स, १९९७, निराली प्रकाशन, पुणे, पी.पी. १४.*